**(सूचना:- बिंदूनामावली नोंदवही पडताळणीसाठी केलेल्या अर्जानुसार तपासणीसाठी देणेत आलेल्या तारखेची माहिती divcommpune.in या वेबसाईटवरील मागासवर्ग कक्ष या टॅबमध्ये "बिंदूनामावली पडताळणी कार्यक्रम" या कॉलम मध्ये पहावी व तारखेस तपासणीसाठी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित रहावे.)**

# बिंदु नामावली तपासणीसाठी करावयाच्या अर्जाचा नमुना

{एमसीए, एमबीए, इंजिनीअरींग, फार्मसी, पदवी, वास्तुशास्त्र, आयुर्वेदिक विभाग, इतर सर्व महाविद्यालये (आर्टस, कॉमर्स, सायन्स, लॉ, बीएड वगळता) यांनी भरावयाचा}

## अर्ज

**प्रति,**

मा. विभागीय आयुक्त,
मागासवर्ग कक्ष, विधान भवन,
विभागीय आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे- १.

**विषय :- बिंदु नामावली नोंदवही पडताळणीसाठी तारीख मिळणेबाबत.**

महोदय,

वरील विषयास अनुसरुन सादर करणेत येते की, आमचे कार्यालयाची ....... , ......., ...... या संवर्गाची बिंदु नामावली नोंदवही आपणाकडे तपासणी/पडताळणीसाठी सादर करावयाची आहे. या संदर्भात खालीलप्रमाणे मुद्दयांची माहिती सादर करीत आहोत. तरी बिंदूनामावली नोंदवही पडताळणीसाठी तारीख मिळणेस विनंती आहे.

| **अ. क्र.** | **विषय** | **तपशील (सदर बाबींची पूर्तता केली अगर कसे? होय/नाही)** |
|---|---|---|
| १ | तपासणी करावयाच्या कार्यालयाचे नाव व पत्ता- | |
| २ | संस्थेचे काही विभाग पुणे विभागाचे बाहेर आहेत काय? | |
| ३ | तपासणी करावयाचे संवर्ग संख्या (उदा. शिक्षक, लिपिक, शिपाई = ३ संवर्ग) | |
| ४ | तपासणी करावयाचे संवर्गाचे मिळून एकूण मंजूर पदे (संख्या) | |
| ५ | कार्यालयीन कर्मचाऱ्यांची संख्या ५०० पेक्षा जास्त असलेस मागासवर्ग कक्ष स्थापन करुन सदर कार्यालयाची प्राथमिक तपासणी त्यांचे मागासवर्ग कक्षाकडून देखील करुन घेतली आहे काय? | |
| ६ | बिंदूनामावली मधील प्रत्येक संवर्गाचा गोषवारा मागील ३ महिन्यापूर्वीपेक्षा जूना सादर केला आहे काय? | |
| ७ | कार्यरत सर्व कर्मचाऱ्यांचे निवडयाद्या, नियुक्ती आदेश व निवड जात प्रवर्गाचे पुरावे उपलब्ध झाले आहेत काय? व ते जोडले आहे काय? | |
| ८ | चालू वर्षाच्या संचमान्यतेनुसार संस्थेने (नियुक्ती प्राधिकारी यांनी) बिंदूनामावली नोंदवही अद्ययावत केली आहे काय? | |
| ९ | बिंदूनामावली नोंदवहीची प्राथमिक तपासणी चालू वर्षाच्या संचमान्यतेनुसार | |

<table>
<tr><td></td><td>प्राथमिक तपासणी अधिकारी (विद्यापीठ) यांनी केली आहे काय ?</td><td></td></tr>
<tr><td>१०</td><td>या कार्यालयाचा विहीत नमुन्यातील दाखला- नमुना I व नमुना II सादर केला आहे काय?</td><td></td></tr>
<tr><td>११</td><td>सरळसेवा संवर्गामध्ये एखाद्या मागासवर्ग कर्मचाऱ्याची निवड त्याच्या स्वत:च्या मागास जात प्रवर्गात न होता खुल्या प्रवर्गातून झाली असलेस त्यास खुल्या प्रवर्गामध्ये नोंदविले आहे काय?</td><td></td></tr>
<tr><td>१२</td><td>या कार्यालयाचा विहीत नमुन्यातील अर्ज, नमुना-III, परिशिष्ट अ, ब, क, नमुना-IV, नमुना-V, नमुना-VI, नमुना-VII, नमुना-VIII, नमुना-IX, नमुना-XI, नमुना-XII प्रतिज्ञापत्र / हमीपत्र, प्रपत्र-अ, प्रपत्र-ब, प्रपत्र-क, प्रपत्र-ड, प्रपत्र ई-१ सादर केले आहेत काय?</td><td></td></tr>
<tr><td>१३</td><td>बिंदूनामावली नोंदवहीमध्ये पांढऱ्या शाईचा (खाडाखोड/पुनर्लेखन, कागदाची चिठ्ठी चिटकवणे यासाठी) वापर केला आहे काय?</td><td></td></tr>
<tr><td>१४</td><td>बिंदू नामावली नोंदवही पृष्ठांकन केले आहे काय?</td><td></td></tr>
<tr><td>१५</td><td>संबंधित संस्थेने बिंदूनामावलीच्या प्रत्येक पानावर नियुक्ती प्राधिकारी यांची स्वाक्षरी घेतली आहे काय?</td><td></td></tr>
<tr><td>१६</td><td>तंत्रशिक्षण महाविद्यालय व व्यवस्थापन बाबत- विद्यापीठ, डिप्लोमा बाबत- एमएसबीटी, आयुर्वेदिक बाबत- नाशिक विद्यापीठ यांच्या स्वाक्षरी नमुना III सरळसेवा व नमुना IV पदोन्नती चे गोषवाऱ्याखाली आहेत काय?</td><td></td></tr>
<tr><td>१७</td><td>अनुदानित/विनाअनुदानित विभागाचे स्वंतत्र बिंदूनामावली ठेवावी.</td><td></td></tr>
<tr><td>१८</td><td>वैद्यक विभागासाठी खालील नमुन्यात मंजूर पदांचा तक्ता सादर करावा.
<table>
<tr><td>पॅटर्न नुसार</td><td>मंजुर पदे</td><td rowspan="2">एकुण</td></tr>
<tr><td>विदयापीठानुसार</td><td>मंजुर पदे</td></tr>
</table></td><td></td></tr>
<tr><td>१९</td><td>कार्यरत कर्मचारी यांचे जात प्रमाणपत्रे व जात वैधता प्रमाणपत्र सादर केले आहे काय?</td><td></td></tr>
<tr><td>२०</td><td>जातवैधता प्रमाणपत्रे प्राप्त असलेबाबत नियुक्ती प्राधिकारी यांनी खात्री करून स्वाक्षरी केली आहे काय?</td><td></td></tr>
<tr><td>२१</td><td>जातवैधता प्रमाणपत्राबाबत सामान्य प्रशासन विभाग, १६-ब, मंत्रालय, मुंबई यांचे शासन निर्णय दिनांक १८/५/२०१३ व दि. २१ ऑक्टोबर २०१५ नुसार मान्यता प्राधिकारी यांनी कार्यवाही केली आहे काय?</td><td></td></tr>
<tr><td>२२</td><td>दिनांक २५/५/१९९० पूर्वीचे भ.ज.क व भ.ज.ड प्रवर्गातील कर्मचाऱ्यांना इतर मागास प्रवर्गामध्ये नोंदविले आहे काय? तसेच दिनांक १८/१०/१९९७ पूर्वी भ.ज.क व भ.ज.ड चे पदोन्नतीने नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांची नोंद खुल्या प्रवर्गात घेतली आहे काय?</td><td></td></tr>
<tr><td>२३</td><td>बिंदूनामावली सोबत सादर केलेल्या कागदपत्रांच्या मूळ प्रती उपलब्ध आहेत काय?</td><td></td></tr>
<tr><td>२४</td><td>सन १९९७ ची  व चालू वर्षाची सेवाजेष्ठता यादी सादर केली आहे काय?</td><td></td></tr>
<tr><td>२५</td><td>यापूर्वी बिंदूनामावलीची तपासणी झाली असलेस तपासणी अहवाल सोबत सादर केला आहे काय?</td><td></td></tr>
<tr><td>२६</td><td>मागील तपासणी अहवालामध्ये विचारण्यात आलेले खुलासे सोबत सादर केले आहेत काय?</td><td></td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| २७ | कार्यालयाचा ई-मेल आयडी (E-mail ID) नमुद करावा. | |
| २८ | सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन परिपत्रक दिनांक २९/५/२०१७ अन्वये नियुक्ती प्राधिकारी यांनी सदर बिंदूनामावली नोंदवहीची प्राथमिक तपासणी करून त्यानंतर अंतिम तपासणीसाठी अर्ज सादर केला आहे का? | |
| २९ | सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन परिपत्रक दिनांक २९/५/२०१७ नुसार दिनांक १८/१०/१९९७ नंतरचे त्या-त्या जात प्रवर्गात वापरलेले बिंदूची संख्या व रिक्त बिंदूबाबतची माहिती  विहीत नमुन्यात सोबत जोडली आहे काय? | |
| ३० | बिंदू नामावली नोंदवहीची तपासणी करावयाचे संवर्ग अनुसूचित क्षेत्रात (पेसा क्षेत्रात) येतात किंवा कसे? | |
| ३१ | सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील शासन निर्णय दिनांक ०५/०३/२०१५ व २६/०६/२०१५ नुसार नियुक्ती प्राधिकारी यांनी अनुसूचित क्षेत्रातील भरावयाची पदे स्थानिक अनुसूचित जमातीच्या व्यक्तींमधून भरणेबाबत कार्यवाही केली आहे अगर कसे? | |

**मान्यता प्राधिकाऱ्यांची स्वाक्षरी**
**नाव :-**
**कार्यालयाचे नाव :-**
**शिक्का :-**

**नियुक्ती प्राधिकाऱ्यांची स्वाक्षरी**
**नाव :-**
**कार्यालयाचे नाव :-**
**शिक्का :-**

(**टीप:**- बिंदू नामावली नोंदवही पडताळणीसाठी सादर करीत असताना आपले कार्यालयाकडील जाणकार प्रतिनिधी यांनी सोबतचा छाननी अर्ज नियुक्ती प्राधिकारी यांचे स्वाक्षरीने प्रमाणित करून सादर करावा.)